# आरती श्री अंबाबाईची

जय देवी जय देवी जय अंबाबाई
आरती ओवाळितो तुज जगज्जननी
जय देवी जय देवी जय अंबाबाई
आरती ओवाळीता तुज मन उन्मनी
जय देवी जय देवी जय अंबाबाई ।। धृ.।।

कोल्हासुर मातला अती झाला गर्वांध
कोल्हापुरी येऊनी त्याचा केला तू वध
आग्रहास्तव भक्तांच्या तेथे केला निवास
शक्तीपीठ म्हणूनी स्थळ ते झाले विख्यात
जय देवी जय देवी जय अंबाबाई ।।१।।

प्रसन्न वदन विशाल नयन भाळी चंदन
मळवट सजावट तनी आस्कंद चरण
गदा ढाल म्हाळुंगासवे वरदहस्त
दर्शनमात्रे होई तन मन हे शांत
जय देवी जय देवी जय अंबाबाई ।।२।।

- नारायण
०५/१६/२०